MHRG040036502022

**दिवाणी चौकशी अर्ज नं. १४६३/२०२२**

**श्री. विशाल लक्ष्मण माळी व इतर ... अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही.**

## निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश

०१. सदरचा अर्ज मुंबई रेग्युलेशन VIII १८२७ अन्वये वारस दाखला मिळणेकरिता दाखल केला आहे.

०२. अर्जातील कथन असे आहे की, गणपत भिवा माळी हे दिनांक ११/१२/१९९० रोजी मयत झाले आहेत. मयत गणपत भिवा माळी यांचे अर्जदार क्र.१ हा नातू, अर्जदार क्र.२ ही सून व अर्जदार क्र.३ हा मुलगा आहे. मयत गणपत भिवा माळी यांची पत्नी यमुनाबाई गणपत माळी हया दिनांक १०/०४/२०१५ रोजी मयत झाल्या आहेत. मयत गणपत भिवा माळी यांचा मुलगा लक्ष्मण गणपत माळी हे दिनांक १३/११/२०२१ रोजी मयत झाले आहेत. मयत लक्ष्मण गणपत माळी यांचे अर्जदार क्र.१ हा मुलगा, अर्जदार क्र.२ ही पत्नी व अर्जदार क्र.३ हा भाऊ आहे. मयत गणपत भिवा माळी यांची आई सखुबाई भिवा माळी हया मयत आहेत.

०३. अर्जदार यांचे व्यतिरिक्त मयत **गणपत भिवा माळी** यांना इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी अन्य कोणत्याही कोर्टात अशा स्वरुपाचा वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दाखल केलेला नाही.

०४. तसेच जाहीरनामा (नि.८) दिनांक ०१/११/२०२२ रोजी व दैनिक 'किल्ले रायगड' मध्ये दिनांक १६/१०/२०२२ रोजी (नि.१२) रोजी जाहीर नोटीस दिल्यानंतर ३० दिवसांत कोणीही सदरच्या अर्जास हरकत घेतलेली नाही.

०५. वरील कथनास पुष्टी देण्याकरिता अर्जदार क्र.१ विशाल लक्ष्मण माळी यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र (नि.९), मयत गणपत भिवा माळी, मयत यमुनाबाई गणपत माळी व मयत लक्ष्मण गणपत माळी यांच्या मृत्यू दाखल्यांच्या पडताळलेल्या प्रती (नि.१३ ते १५), सातबारा उतारा (नि.१६), सातबारा उतारा (नि.२८), अर्जदार यांचे रेशनकार्ड व आधारकार्डच्या पडताळलेल्या प्रती (नि.१७ ते २१), मयत गणपत भिवा माळी यांची आई सखुबाई भिवा माळी हया मयत असून त्यांचा मृत्यू दाखला उपलब्ध नसलेबाबत अर्जदार क्र.१ विशाल लक्ष्मण माळी यांनी दाखल केलेले शपथपत्र (नि.२२) व मुल्यांकन अहवाल (नि.२५) हे दस्तऐवज दाखल केले आहेत.

०६. अभिलेखावरील सर्व दाखल दस्तऐवजांचे तसेच वरील सर्व बाबींचे विवेचन केल्यानंतर असे स्पष्ट होते की, अर्जदार हे मयत **गणपत भिवा माळी** यांचे कायदेशीर वारस असून सदर अर्जाला कोणीही हरकत घेतलेली नाही. म्हणून अर्ज मंजूर करुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

०१ अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२ **अर्जदार क्र.१**–श्री. विशाल लक्ष्मण माळी**, अर्जदार क्र.२**–श्रीमती सुलोचना लक्ष्मण माळी व **अर्जदार क्र.३**–श्री. अनंत गणपत माळी हे मयत **गणपत भिवा माळी** यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे नावे वारस दाखला देण्यात यावा.

०३ अर्जदार यांनी आवश्यक ते न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरावे.

AVANI ASHWIN GODSE — Digitally signed by AVANI ASHWIN GODSE Date: 2023.08.07 15:47:36 +0530

पनवेल

दिनांक : ०७/०८/२०२३

(अ.अ. गोडसे )

२रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल.